आरोग्य विशेष...
>> पान 2

आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल कांगणे यांचे प्रबोधनात्मक कार्यक्रम
>> पान 3

विदर्भ-मराठवाडा संपर्क तुटला
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
नेहमी शांत आणि संयमी राहा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 28 ■ सोमवार, दि. 18 ऑगस्ट 2025 ■ पाने 8 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



साऊथची सर्वात श्रीमंत अभिनेत्री, संपत्तीच्या बाबतीत अनुष्का शर्मा-कतरिना कैफही हिच्यासमोर पाणी कम चाय

आतील पान

## महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार: एनडीएनं केली उमेदवारी जाहीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर उपराष्ट्रपती पदाची निवडणूक सप्टेंबर महिन्यात होणार आहे. त्यासाठी भारतीय जनता पक्षानं उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल चंद्रपुरम पोन्नुसामी राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा केली. भाजपाच्या मुख्यालयात झालेल्या संसदीय मंडळाच्या बैठकीत सी पी राधाकृष्णन यांचं नाव अंतिम करण्यात आलं. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. सी पी राधाकृष्णन यांनी ३१ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन हे मूळचे तमिळनाडूचे आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून नियुक्तीपूर्वी त्यांनी दीड वर्षे झारखंडचे राज्यपाल म्हणून काम पाहिलं. झारखंडचे राज्यपाल म्हणून सी पी राधाकृष्णन यांची भारताच्या राष्ट्रपतींनी तेलंगणाचे राज्यपाल आणि पुद्दुचेरीचे उपराज्यपाल म्हणून नियुक्ती केली. सी पी राधाकृष्णन यांना राजकारणात चार दशकांहून अधिक अनुभव आहे. सी पी राधाकृष्णन हे तामिळनाडूच्या राजकारणात महत्वाचं नाव आहे. २० ऑक्टोबर १९५७ रोजी तामिळनाडूतील तिरुप्पूर इथं सी पी राधाकृष्णन यांचा जन्म झाला. सी पी राधाकृष्णन यांनी पदवी प्राप्त करतानाच चळवळीत काम केलं. राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून त्यांनी सुरुवातीपासूनचं काम केलं. त्यानंतर १९७४ मध्ये ते भारतीय जनसंघाचे राज्य कार्यकारी समिती सदस्य झाले.

सी पी राधाकृष्णनं यांची १९९६ मध्ये तामिळनाडू भाजपाचे सचिव म्हणून नियुक्ती झाली. १९९८ मध्ये ते पहिल्यांदा कोइम्बतूर इथून लोकसभेवर निवडून गेले. त्यांनी दोन वेळा लोकसभेत प्रतिनिधीत्व केलं. खासदार असताना त्यांनी कापड उद्योगासाठी संसदीय स्थायी समितीचं अध्यक्ष म्हणून काम पाहिलं. सी पी राधाकृष्णन हे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांसाठी संसदीय समिती आणि वित्त सल्लागार समितीचे सदस्य देखील होते. तर स्टॉक एक्सचेंज घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या संसदीय विशेष समितीचे ते सदस्य होते.



## पुण्यात सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांना बॅनरच्या माध्यमातून पुणेरी टोले

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांना आवाहन करणारे बॅनर्स लावण्यात आले आहेत. अण्णा आतातरी उठा, भकर्णसुद्धा गाढ झोपेतून रावणासाठी आणि लंकेसाठी उठला होता. तुम्ही आपल्या देशासाठी आतातरी उठा,देशात मतांची चोरी होत असताना,देशात भ्रष्टाचार फोफावला असताना, देशात हुकूमशाही माजलेली असताना,देशाची लोकशाही धोक्यात असताना अण्णा तुमच्या सारखा जेष्ठ गांधीवादी समाजसेवक शांत कसा? अण्णा, दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर पुन्हा तुमची जादू पाहण्यासाठी देश आतुर आहे.असे पुणेरी टोले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना बॅनरच्या माध्यमातून लगावण्यात आले आहे. सध्या या बॅनरची चांगलीच चर्चा होत आहे.

## मी करत राहावं आणि तुम्ही झोपून राहावं ही अपेक्षा चुकीची अण्णा हजारे यांचे मत



**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** मी १० कायदे आणले, मात्र ९० वर्षानंतर देखील मी करत राहावे आणि तुम्ही झोपून राहावे ही अपेक्षा चुकीची.असे मत अण्णा हजारे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. अण्णा म्हणाले की, जे केले ते आपण करावे असे तरुण युवकांना वाटलं पाहिजे, देशाचे नागरिक आहेत. तर आपलं काही कर्तव्य आहे की नाही. काल स्वतंत्र दिवस साजरा केला. नुसता तिरंगा हातात घेऊन होणार नाही. बोट दाखवून काहीही होणार नाही. मी मोठ्या आशेने तरुणाकडे पाहतो आहे. युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे, ही जागी झाली. तर उद्याच भविष्य दूर नाही. मात्र, एवढे वर्ष लढून कायदे करून जेव्हा कानावर येते अण्णांनी जाग झाले पाहिजे. तेव्हा वाईट वाटत. अण्णा हजारेंनी पुण्यात लावलेल्या फ्लेक्सबोर्ड वर नाराजी व्यक्त करत प्रतिक्रिया दिली.

## एल्विश यादवच्या घरावर गोळीबार, २५ ते ३० गोळ्या झाडल्या

**गुरुग्राम :** हरियाणातील गुरुग्राममध्ये धक्कादायक घटना घडली. युट्यूबर एल्विश यादवच्या घरावर गोळीबार झाला. बाईकवरुन आलेल्या गुंडांनी एल्विश यादवच्या घरावर २५ ते ३० गोळ्या झाडल्या. या गोळीबारात कोणीही जखमी झालेले नाही. पोलीस या प्रकरणी तपास करत आहेत. सीसीटीव्ही फूटेजच्या मदतीने तपास सुरू आहे. एल्विश गुरुग्रामच्या सेक्टर ५७ मध्ये त्याच्या कुटुंबासह राहतो. ज्यावेळी गोळीबार झाला त्यावेळी एल्विश घरात नव्हता. गोळीबार पहाटेच्या सुमारास झाला. गोळीबार झाला तेव्हा घरी फक्त एल्विशची आई आणि एक केअरटेकर असे दोघेच होते. पण गोळीबार झाल्यापासून एल्विशचे नातलग दहशतीच्या छायेत वावरत आहेत.

## आई-वडील, सासू-सासऱ्यांना त्रास देणाऱ्यांची खैर नाही

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईसारख्या महानगरात वृद्धांच्या छळाच्या घटना चिंताजनक पातळीवर वाढताना दिसत आहेत. स्वत:चे म्हातारपण शांततेत, आधाराने घालवण्याची अपेक्षा करणाऱ्या अनेक ज्येष्ठ नागरिकांवर घरातच छळ, शिवीगाळ, मारहाण, मानसिक त्रास यांसारखे प्रकार घडत आहेत. हे अत्याचार बहुधा सुना आणि पोटची मुलेच करतात, ही बाब अधिक गंभीर आहे.

अनेक वेळा कायद्याचा गैरवापर करून वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर काढण्याचे, बदनामी करण्याचे किंवा वारंवार मानसिक त्रास देण्याचे प्रकार घडतात. मात्र या गंभीर घटनांनंतरही अनेक ज्येष्ठ नागरिक पोलिसांकडे तक्रार करण्यास पुढे सरसावत नाहीत. कारण त्यांना भीती असते ती ''आपल्या लेकरांनीच आपल्यावर हात उचलला तर आपण पोलिसांत तक्रार केली तर समाज काय म्हणेल?'' बदनामीची भीती, एकटेपणाचा आहेर आणि कुटुंब तुटून जाण्याची शक्यता यामुळे हे वृद्ध नागरिक गप्प राहतात. मात्र अशा परिस्थितीत आता मुंबई पोलिसांनी पुढाकार घेत ज्येष्ठ नागरिकांना धीर दिला आहे.''घाबरू नका, तक्रार करा, आम्ही तुमच्या सोबत आहोत'' असा स्पष्ट संदेश पोलिसांनी दिला आहे.

### पोलीस करणार कठोर कारवाई



**कायद्याचा आधार वृद्धांसाठी**

पोलिस अधिकारी सांगतात की, जर वृद्धांनी औपचारिकरीत्या तक्रार दाखल केली तर ज्येष्ठ नागरिक आणि पालकांचे कल्याण तसेच पालनपोषण अधिनियम (२००७) तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत कठोर कारवाई करता येते. छळ करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून शिक्षा करणे शक्य आहे. म्हणजे कायदा वृद्धांचे रक्षण करण्यासाठी सक्षम आहे.

तथापि वास्तवात मात्र चित्र वेगळे दिसते. बऱ्याचदा ज्येष्ठ नागरिक पोलिसांकडे जाऊन औपचारिक तक्रार देण्याऐवजी ''साहेब, थोडी समज द्या, घरचे प्रकरण आहे'' असे म्हणून पोलिसांना विनंती करतात. त्यामुळे प्रकरण दमदाटी करून मिटवले जाते. मात्र त्याचा परिणाम असा होतो की छळ सुरूच राहतो आणि वृद्ध नागरिक अधिक त्रासाला सामोरे जातात.

### काही महिन्यांत मुंबईतील विविध भागांतून वृद्धांवरील छळाच्या अनेक घटना समोर आल्या आहेत

१४ ऑगस्ट २०२५, वर्सोवा – पाणी गरम करण्याच्या छोट्या वादातून एका सुनेने आपल्या सासऱ्याला गंभीर मारहाण केली.. या घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सुनेवर गुन्हा दाखल केला.

२८ एप्रिल २०२५, वांद्रे – सुमन तिवारी (५८) यांना सुनेने ढकलून दिले. दरवाज्याला जोरात आपटल्याने त्यांच्या डोक्याला, छातीला आणि पोटाला गंभीर दुखापती झाल्या.

दहिसर – एका वडिलांवर त्यांच्या स्वत:च्या मुलाने काठीने हल्ला केला.

माहीम – एका आईवर तिच्याच मुलाने प्राणघातक हल्ला केल्याचे समोर आले.

गोरेगाव – दोन महिन्यांपूर्वी मुलाच्या जाचाला कंटाळून ७८ वर्षीय महिलेने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सुदैवाने योग्य वेळी उपचार झाल्याने त्यांचे प्राण वाचले

## वीज कोसळून एकाचा मृत्यू, सात जण जखमी

**वर्धा/प्रतिनिधी :** विदर्भात मुसळधार पाऊस सुरु असून वर्धा, बुलढाणा आणि भंडारा जिल्ह्यांत मुसळधार पावसाने हजेरी लावलीय. वर्धा जिल्ह्यातील हिरापूर (तळणी) येथे शेतात शनिवारी फवारणी करत असताना शेतात आडोशाला उभ्या असलेल्या झाडावर दुपारी १.३० वीज कोसळल्याने वृषभ कोटगले वय २२ या तरुणाचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले. वृषभ कोटगले याने शनिवारी स्वप्नील कोडापे, संजय गोळे आणि विष्णू भोयर यांना सोबत घेऊन शेतात फवारणी केली. शेतामध्ये काम करत असताना पावसाने हजेरी लावली. यावेळी स्वप्नील, संजय आणि विष्णू या तिघांनी एका झाडाखाली आसरा घेतला तर वृषभ हा जवळच्याच दुर्सया झाडाखाली आडोशाला थांबला. यावेळी ढगांच्या गडगडाटासह पाऊस सुरू असतानाच वृषभ उभा असलेल्या झाडावर वीज कोसळली आणि यात घटनास्थळीच त्याचा मृत्यू झाला. दरम्यान स्वप्नील कोडापे, संजय गोळे आणि विष्णू भोयर हे जखमी झाले. पुलगाव पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला.

## हॉटेलमध्ये आले, जेवण केलं, जाताना दोघांचा रक्तरंजित कांड, जालन्यात मालकाला पाडलं रक्ताच्या थारोळ्यात

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरातील छत्रपती संभाजीनगर रोडवरील एका हॉटेलमध्ये धक्कादायक प्रकार घडला आहे. इथं दोन जणांनी जेवणाचं बिल मागितल्याच्या कारणावरून हॉटेल मालकासह एका सहकाऱ्यावर चाकुने वार केले आहेत. या हल्ल्यात दोघेजण जखमी झाले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. यातील एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर दुसरा आरोपी फरार आहे. पोलीस फरार आरोपीचा शोध घेत आहेत. ही घटना शहरातील छत्रपती संभाजीनगर रोडवरील 'बिस्मिल्ला' हॉटेलमध्ये घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, अविनाश मोरे नावाचा व्यक्ती आपल्या एका साथीदारासोबत संभाजीनगर रोडवरील बिस्मिल्ला हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी आला होता. जेवण झाल्यानंतर हॉटेल मालक मन्सूर खान आणि त्यांचा सहकारी फरदीन खान यांनी जेवणाचे बिल मागितले. पण अविनाशने बिल देण्यास नकार दिला. याच कारणावरून आरोपी अविनाश मोरे आणि त्याच्या साथीदारासोबत हॉटेल मालकाचा वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपींनी धारदार चाकूने मन्सूर खान आणि फरदीन खान यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. या घटनेदरम्यान, घटनास्थळी उपस्थित असलेल्या काहींनी मध्यस्थी करत आरोपींना पकडलं. आणि दोन्ही जखमींना तत्काळ खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं.

या घटनेदरम्यान, उपस्थित नागरिकांनी धाडस दाखवत एका आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. कदीम जालना पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मुख्य आरोपी अविनाश मोरे याला अटक केली आहे. त्याचा दुसरा साथीदार मात्र फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## खोपोलीतील मतदार यादीत १४० नागरिकांची दुबार नावे; दोषींवर कारवाई करण्याची आप नेत्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** देशभरात मतदार याद्यांतील गैरव्यवहार आणि मतचोरीच्या आरोपांमुळे राजकीय वातावरण तापलं असताना रायगड जिल्ह्यातील खोपोलीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खोपोली शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील मतदार यादी तपासताना तब्बल १४० मतदारांची नावं दोन वेळा आढळल्याचा आरोप आम आदमी पक्षानं केला आहे. आम आदमी पक्षानं यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करत, या प्रभागातील संपूर्ण मतदार यादीची पुन्हा तपासणी करण्यात यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

आप पक्षाचे प्रदेश संघटन सचिव डॉ. रियाज खान पठाण यांनी खोपोलीतील मतदार यादींचा सखोल अभ्यास करून धक्कादायक प्रकार उघडकीस आणला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रभाग क्रमांक १० मधील एकूण ५ मतदार याद्यांचे परीक्षण करण्यात आलं. या याद्यांमध्ये सुमारे ४,५०० ते ५,००० मतदारांच्या नावांचा तपशील तपासला असता यात १४० मतदारांची नावं दोन वेळा नोंदवलेली आढळली. या दुहेरी नोंदींव्यतिरिक्त, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेले मतदार तसेच गेल्या अनेक वर्षांपूर्वी निधन पावलेले नागरिक यांची नावेदेखील अद्याप मतदार याद्यांमध्ये कायम असल्याचा गंभीर मुद्दा डॉ. पठाण यांनी उपस्थित केला आहे. खोपोलीतील मतदार यादीतील गंभीर त्रुटींवर लक्ष वेधत आम आदमी पक्षाने खालापूर तहसीलदार आणि निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. पक्षाचे शहराध्यक्ष ग्यासुद्दीन खान यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितलं की, या चुका केवळ खोपोलीपुरत्याच मर्यादित नाहीत. तर संपूर्ण कर्जत विधानसभा मतदारसंघातही अशाच प्रकारच्या मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळण्याची शक्यता आहे. खान यांच्या मते, अशा चुका निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात आणि त्यामुळे तातडीने संपूर्ण मतदार यादीचे पुनर्परीक्षण करून आवश्यक दुरुस्ती करणं अत्यंत गरजेचं आहे.

विशेष म्हणजे, मागील विधानसभा निवडणुकीत कर्जत-खालापूर मतदारसंघात आम आदमी पक्षाचे उमेदवार सुधाकर घारे यांना केवळ ५ हजार मतांनी पराभव स्विकारावा लागला होता. एवढ्या कमी फरकानं





निकाल ठरला असताना दुबार नावांची नोंद, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची उपस्थिती यांसारख्या गोंधळामुळे निकालावर थेट परिणाम होऊ शकतो, असा आरोप आप नेत्यांनी केला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इंडिया आघाडीनंही अलीकडेच मतदार याद्यांतील त्रुटींवरून निवडणूक आयोगावर मतचोरीचे आरोप केले होते. त्यानंतर आता रायगडमधून समोर आलेला हा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात आहे.


मतदार यादीतील नावं दोनदा आढळून आल्यास ती थेट रद्द केली जाऊ शकत नाहीत. अशा प्रकरणांमध्ये एक नाव रद्द करण्यासाठी मतदारानं 'फॉर्म नंबर ७' भरून अर्ज करणं आवश्यक असते, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा खालापूर नायब तहसीलदार भोईर यांनी दिली आहे. तक्रारदार डॉ. रियाज पठाण यांना दिलेल्या उत्तरात भोईर यांनी स्पष्ट केलं की, मतदार यादी अद्ययावत केली जात असताना आणि नाव दोनदा असलेल्या मतदारांना नोटीस पाठवून प्रत्यक्ष बोलावलं जातं. त्या प्रक्रियेनंतरच कोणते नाव कायम ठेवायचं आणि कोणते नाव रद्द करायचं, याचा निर्णय घेतला जातो.

## असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय चेहरा, ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ज्योती चांदेकर या मराठी रंगभूमीवरील नावाजलेल्या अभिनेत्री होत्या. केवळ रंगभूमीवरच नाही तर चित्रपट आणि दूरचित्रवाहिनीवरील मालिकेतही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. ज्योती चांदेकर यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. लहान असतानाच त्यांनी काही नाटकात अभिनय केला. पुढे अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी नाटकात भूमिका केल्या. त्यांनी अभिनय केलेले सुंदर मी होणार आणि मिसेस आमदार ही नाटके रंगभूमीवर तुफान गाजली. त्यातील त्यांच्या भूमिका त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरल्या. या भूमिकांनी त्यांना रंगभूमीवर असामान्य अभिनेत्री असा गौरव मिळवून दिला. या नाटकातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यानंतर त्यांनी चित्रपटाकडे आपला मोर्चा वळवला. ग्यानबाची मेख हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यानंतर त्यांनी तिचा उंबरठा, ढोलकी, सुखांत, मी सिंधुताई सपकाळ, फुलवात, देवा, श्यामची आई या चित्रपटातूनही भूमिका केल्या. ज्योती चांदेकर यांनी रणजीत पंडित यांच्याशी विवाह केल्यावर त्यांना पौर्णिमा व तेजस्विनी या दोन मुली झाल्या. तेजस्विनी ही मराठी चित्रपट सृष्टीतील सध्याची आघाडीची अभिनेत्री आहे. लग्नानंतरही ज्योती चांदेकर यांनी आपले नाव बदलले नाही. ज्योती चांदेकर यांच्या अभिनय कारकिर्दीसाठी त्यांच्या पतीने मोठा त्याग केला. ज्योती चांदेकर यांची अभिनय कारकिर्द सुरू रहावी यासाठी त्यांच्या पतीने आपली नोकरी सोडली आणि मुलींचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. ज्योती चांदेकर यांच्या कारकिर्दीत अनेक चढ उतार निर्माण झाले पण त्या डगमगल्या नाहीत. आलेल्या संकटावर त्यांनी मात केली आपली अभिनय कारिकर्द यशस्वी केली. चित्रपट आणि नाटकासोबतच त्यांनी टीव्हीवरील मालिकेतही भूमिका केल्या. त्यांनी साकारलेली ठरलं तर मग मालिकेतील पूर्णा आजी, मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटातील सिंधुताई सपकाळ या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. देवा एक अतरंगी या चित्रपटामधील त्यांची भूमिका देखील प्रेक्षकांना भावली. ज्योती चांदेकर यांनी असंख्य नाटकं आणि मालिका यांच्या माध्यमातून आपल्या अभिनयकलेचा अविस्मरणीय ठसा उमटवला. ठरलं तर मग आता या मालिकेत त्यांनी साकारलेली पूर्णा आजी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. या भूमिकेने त्यांना घराघरात पोहचवले. ज्योती चांदेकर या संपूर्ण महाराष्ट्राची लाडकी पूर्णा आजी बनल्या. याच मालिकेत अभिनय करत असताना त्या आजारी पडल्या आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. पडद्यावरील त्यांची सहजसुंदर अभिव्यक्ती, आत्मीय भाव आणि प्रांजळ संवादकळा प्रेक्षकांच्या मनात कायम राहतील. त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ आई, जिव्हाळ्याची कलाकार, असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

# बिझी मित्रांनो, आरोग्या बाबत काही नियम पाळा

वजन नियंत्रणात ठेवणे, आरोग्य चांगले ठेवणे या गोष्टी बर्?याच अवघड असतात असे समजले जाते. काही लोक मात्र आहे त्या वजनाचेच राहतात आणि टुणटुणीत असतात. मग हे लोक असे काय करतात की, ज्यामुळे त्यांचे वजन एका ग्रॅमनेही वाढत नाही आणि त्यांच्या हालचालीत कधी जडपणा येत नाही. खरे म्हणजे स्वत:ला मेंटेन केलेल्या या लोकांनी वजन वाढू नये म्हणून काहीच केलेले नसते. त्यांचे वजन वाढण्याची शक्यताच नसते. त्याची दोन कारणे असतात. भरपूर तेलकट आणि गोड पदार्थ खाल्ले की वजन वाढत असते आणि या लोकांना तसे तेलकट आणि गोड पदार्थ खायलाच मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या वजनाचा फारसा प्रश्न येत नाही. त्यांचे वजन आपोआपच नियंत्रणात राहते.



अशा लोकांची दिनचर्या ठरलेली असते. ते कोणत्याही सार्वजनिक कामात कधी भाग घेत नाहीत. तहानभूक हरपून एखाद्या छंदाच्या मागे लागावे तर तशीही शक्यता त्यांच्या आयुष्यात नसते. त्यांचे आयुष्य सुतासारखे सरळ असल्यामुळे आणि दिनचर्या ठरलेली असल्यामुळे वेळेत जेवण, वेळेत झोप आणि योग्य तेवढे काम असा त्यांचा दिनक्रम ठरलेलाच असतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यात बिघाड होण्याचे काही कारणच नसते. मात्र ज्या लोकांना भरपूर काम असते, खूप व्याप मागे असतात आणि त्यामुळे ज्यांना वेळेवर जेवायला मिळत नाही, पुरेशी झोप मिळत नाही त्यांच्या आरोग्याला मात्र धोका असतो.

मग आरोग्य सांभाळावे की व्याप सांभाळावेत, असा प्रश्न त्यांना पडतो. पण त्यांचे व्याप त्यांना गप्प बसू देत नाहीत. म्हणून अशा लोकांना व्यापातूनही आरोग्य कसे सांभाळावे याच्या काही टिप्स् देण्याची गरज असते. अशा लोकांनी खाणे आणि व्यायाम यांच्याबाबतीतली शिस्त पाळण्याची फार गरज असते. मात्र त्यांना वेळेवर व्यायाम करायला सवड मिळत नाही आणि कधी खावे, काय खावे आणि किती खावे यावर त्यांचे नियंत्रण नसते.

असे असले तरी त्यांना काही गोष्टी आवर्जून करता येतात. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे ब्रेकफास्ट न टाळणे, जेवणात आणि न्याहारीमध्ये द्विदल धान्यांचा वापर करणे. रोज सकाळी मॉर्निंग वॉक घेता आला नाही तरी शक्य तेवढे चालणे, म ोठ्या इमारतीच्या पायर्?या शक्यतोवर चढणे अशा गोष्टी त्यांच्या हातात असतात. आपल्याला वेळेवर व्यायाम आणि खाणे शक्य होत नाही म्हणून या दोन गोष्टी पूर्णपणे सोडून दिल्याच पाहिजेत असे नाही. त्यांच्या बाबतीत आपण जाता जाता काही पथ्ये तारतम्याने पाळू शकतो आणि आरोग्य राखू शकतो.

## पावसाळ्यात स्वत:ला ठेवा हेल्दी

पावसाला नुकतीच दमदार सुरूवात झाली आहे. पावसाळा हा ऋतू सर्वांच्याच आवडीचा आहे. सहाजिकच पावसाला सुरूवात झाली की पावसात भिजण्याचे आणि पावसाळी पिकनिकचे वेध अनेकांना लागतात. मात्र पावसाळ्यात हवामानातील आर्द्रता अधिक प्रमाणात वाढते. ज्यामुळे हे वातावरण जीवजंतूसाठी पोषक ठरतं. पावसात दूषित पाणी, जंतूसंसर्ग यामुळे साथीचे आजार लवकर पसरतात. पावसाळा कितीही आनंददायी असला तरी या ऋतूत आजारपण येण्याची शक्यतादेखील तितकीच वाढते. म्हणूनच घरात जर लहान मुलं अथवा वृद्ध माणसं असतील तर या दिवसांमध्ये त्यांच्या आरोग्याची काळजी अधिक घेण्याची गरज असते. यासाठीच पावसाळ्यात आजारपणापासून दूर ठेवण्यासाठी काही घरगुती उपाय नक्कीच फायद्याचे ठरू शकतात.

कोमट पाणी प्या

पावसाळ्यामध्ये हवामानामध्ये दमटपणा वाढतो. ज्यामुळे जंतूसंसर्ग लवकर होऊ शकतो. शिवाय पचनशक्ती मंदावल्याने तुम्हाला अपचन, पोटाच्या समस्या देखील जाणवू शकतात. यासाठी सोपा उपाय म्हणजे पावसाळ्यात नियमित कोमट पाणी प्या. सकाळी उठल्यावर, रात्री झोपताना आणि जेवणापूर्वी कोमट पाणी पिण्याची सवय लावा ज्यामुळे तुमचे आजारपणापासून रक्षण होईल. शिवाय शक्य असल्यास घराबाहेर पडताना पाण्याची बाटली जरूर न्या. ज्यामुळे बाहेरील दूषित पाण्याचा तुम्हाला त्रास होणार नाही.

गवती चहा अथवा आल्याचा चहा

पावसाळ्यातील थंड हवामानावर मात करण्यासाठी अनेकजण चहाचा आसरा घेतात. पाऊस पडू लागल्यावर गरमागरम, वाफाळता चहा घेण्यात एक वेगळीच मौज असते. मात्र या दिवसात वारंवार चहा घेतल्यामुळे तुम्हाला ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो. पण जर तुम्हाला चहा आवडतच असेल दिवसभरात दोन वेळा गवती चहा अथवा आल्याचा चहा घ्या.

चहामध्ये साखर आणि दूधाचा वापर कमी प्रमाणात करा. ज्यामुळे तुम्हाला सर्दी, खोकला असे आजार नक्कीच होणार नाहीत. मसाला चहासोबत तुम्ही ग्रीन टीदेखील नक्कीच घेऊ शकता.

अंघोळीच्या पाण्यात कडूलिंबाच्या पाला वापर

कडूलिंबाची पाने पाण्यात उकळून त्या पाण्याने अंघोळ केल्यास तुम्हाला कोणतेही त्वचेचे विकार होत नाहीत. पावसाळ्यात दूषित पाण्यातून चालल्यामुळे पाय अथवा इतर अवयवांवर नायटा, खरूज असे त्वचेचे विकार होण्याची शक्यता असते. शिवाय ओले कपडे बराच वेळ अंगावर राहिल्यास हे विकार बळावू शकतात. यासाठी अंघोळीच्या पाण्यात कडूलिंबाची पाने अथवा त्याचा रस टाका.

हलका आहार घ्या

पावसाळ्यात अती तळलेले, मसालेदार पदार्थ खाण्याची कितीही इच्छा झाली तरी त्याचा मोह टाळा. कारण अशा मसालेदार पदार्थांमुळे तुम्हाला पचनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे या दिवसांमध्ये मांसाहार आणि जड आहार घेण्यापेक्षा हलका आणि सात्विक आहार घेण्याचा प्रयत्न करा.

आर्युर्वेदिक धूप


पावसाळ्यात घरातील वातावरण शुद्ध ठेवण्यासाठी तुम्ही घरात आयुर्वेदिक धूप घालू शकता. कोणत्याही आयुर्वेदिक दुकानात धूपाचे साहित्य मिळते. अशा प्रकारचा धूप घरात दाखवल्यामुळे घरात डास अथवा जीवजंतूंचा प्रादूर्भाव होत नाही. घरातील खिडक्यांच्या कोपऱ्यामध्ये, बाथरूममध्ये वाटीत खडे अथवा जाडे मीठ ठेवावे. मीठामुळे घरातील वातावरण निर्जंतूक राहण्यास मदत होते. शिवाय सर्दी–खोकला झाल्यास जाड्या मीठाचा शेक घेतल्यामुळे आराम मिळतो.

बाल्कनीत असावे तुळशीचे रोप

घराच्या खिडकीत अथवा बाल्कनीमध्ये तुळशीची रोपं लावावी. भारतीय संस्कृतीत तुळशीचे झाड घरासमोर लावण्याला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. वास्तविक तुळस ही एक आयुर्वेदिक वनस्पती आहे. तुळशीचे रोप घराबाहेर लावलेले असल्यास घरातील वातावरण शूद्ध राहण्यास मदत होते. ज्यामुळे सर्दी, खोकल्यासारखे आजार कमी प्रमाणात होतात. शिवाय सर्दी खोकला झाल्यास पटकन तुळशीच्या पानांचा रस अथवा काढा घ्यावा. ज्यामुळे लवकर आराम मिळतो.

मधाचे चाटण घ्या

दररोज सकाळी एक चमचा मध आणि चिमूटभर हळदीचे चाटण नियमित घ्या. ज्यामुळे सर्दी, खोकल्याचा त्रास नक्कीच कमी होऊ शकतो. कोमट पाण्यातून नियमित मध घेतल्यास पचनसमस्या देखील कमी प्रमाणात होतात. यासाठीच पावसाळ्यात घरात मध जरूर ठेवा. लहान मुलांनादेखील तुम्ही मधाचे चाटण नक्कीच देऊ शकता.



## पाठदुखीवर सोपे व्यायाम

एकाच अवस्थेत दीर्घकाळ बसल्यामुळे पाठदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते. विशेषत: संगणकासमोर बसून काम करणार्?या लोकांना हा त्रास अधिक संभवतो. त्यांना तर हात, खांदे, मान, पाठ यामध्ये काही ना काही तरी त्रास होण्याची शक्यता असते. विशेषत: पाठीच्या कण्याला आधार देणारे स्नायू दुखावले जाऊन किंवा आखडले जाऊन नव्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यासाठी मानेपासून माकड हाडापर्यंत सगळे स्नायू लवचिक असण्याची गरज आहे. त्यासाठी खालील व्यायाम करावेत.

१) पाठ वाकवणे – हात डोक्यापर्यंत वर करून पाठीला बाक देणे आणि हात मागे नेणे. हा व्यायाम दोन–तीन वेळा करावा. काम करताना सलगपणे एकाच अवस्थेत न बसता थोडेसे मधेच उठून शरीराला या दिशेने ताण द्यावा, त्यामुळे पाठ वाकली जाते आणि स्नायू लवचिक होतात. अशा प्रकारचा व्यायाम अधूनमधून करावा. त्याचा फायदा रक्ताच्या प्रवाहावर सुद्धा होत असतो.

२) केवळ तुमचे पाठीचेच स्नायू लवचिक असणे आवश्यक आहे असे नाही तर कमरेचे विशेषत: कटी म्हणजे पोटाच्या दोन बाजूंचे स्नायूही लवचिक असावे लागतात. त्यासाठी अर्धचक्रासन करावे. अर्धचक्रासन म्हणजे डाव्या कमरेवर डावा हात ठेवून उजवा हात कानाकडून डावीकडे वळवणे. असाच व्यायाम उजवा हात उजव्या कमरेवर ठेवून डावा हात कानाजवळून वर करून तो उजवीकडे वळवावा म्हणजे दोन्ही बाजूंनी कमरेला बाक मिळतो.

३) ताडासन – हात सरळ वर करावे आणि हातासहीत सगळ्या शरीराला वरच्या दिशेने ताण द्यावा. अशावेळी टाचावर उभे रहावे आणि जणू आपले शरीर कोणी तरी वर ओढत आहे इतका शरीराला मिळावा. त्यामुळे एका जागी बसून आखडलेले स्नायू मोकळे होतात. आपण झोपेतून उठल्याबरोबर आळस देतो. आळस देण्याच्या या क्रियेमध्ये सगळे शरीर आखडून पुन्हा सोडून देतो. आपण या आळस देण्याच्या क्रियेकडे व्यायाम म्हणून पहात नाही. परंतु त्यामुळे आपले आळसावलेले शरीर मोकळे होते याचा अनुभव मात्र आपल्याला येत असतो. तेव्हा केवळ झोपेतून उठल्यानंतरच नव्हे तर दिवसभरात कधीतरी चार–पाच वेळा आळस द्यावा. आळस देण्याच्या बाबतीत आळशीपणा करू नये.

## जसा मूड तसे चालणे

‘बोले तैसा चाले, त्यांची वंदावी पाऊले’ असे म्हटले जाते. याचा अर्थ पूर्णपणे वेगळा आहे. म्हणजे जो माणूस जे बोलतो तसे वर्तन करतोच असे नाही. दुसर्?याला सद्वर्तनाचा उपदेश करणारे लोक स्वत: तसे वर्तन करत नाहीत. मात्र काही लोक लोकांना जसा उपदेश करतात तसेच वागतात म्हणून तुकाराम महाराजांनी ‘बोले तैसा चाले’ असे म्हटले आहे. यातला चाले हा शब्द पायांनी चालण्याशी संबंधित नाही तर चाले याचा अर्थ चालचलणूक म्हणजे वागणे असा आहे. मात्र काही लोकांनी चाले याचा अर्थ पायांनी चालतो असा करून काही`ष केले आहेत.

जो जसा बोलतो तसा चालतो, त्याच्यासाठी बोले तैसा चाले अशी उक्ती विनोदाने वापरली जाते. दारूड्या माणूस अडखळत बोलतो आणि अडखळतच चालतो. म्हणजे जसा बोलतो तसाच चालतो. माणसाचे चालणे कसे असावे हे त्याच्या मन:स्थितीवरून ठरत असते. आनंदी माणूस पंजावर उड्या मारत चालतो. रागीट माणूस दणादण पाय आपटत चालतो. पायांची ही शैली त्याच्या मन:स्थितीचे दर्शन घडवते. याचा उलटा अर्थ आपण घेऊ शकतो. पाय आपटत चालणारा माणूस रागात आहे असे समजावे आणि उड्या मारत चालणारा माणूस आनंदात आहे असे समजावे.

केवळ पायावरच नव्हे तर खांदे, मान, पाठ या सगळ्यांची अवस्था चालताना जशी असते तशी ती त्याच्या मन:स्थितीवर अवलंबून असते. निराश झालेला माणूस किंवा कायमच नैराश्यवादी असणारा माणूस खांदे पाडून चालतो. अतीशय घाईला आलेला माणूस भरभर हात हलवत चालतो. त्या मानाने निवांत असलेला माणूस हातांच्या हालचाली सावकाशही करतो आणि हात फार लांबवर हलवतही नाही. कॅनडातल्या काही मानसशास्त्रज्ञांनी माणसाचे चालणे आणि त्याची मन:स्थिती यांचा संबंध असल्याचे अनेक प्रयोगातून सिद्ध करून दिले आहे.

## फक्त साखरच नव्हे, पांढरे मीठही आहे डायबेटिसच्या रुग्णांसाठी धोकादायक! डॉक्टरांनी दिला महत्त्वाचा सल्ला

जर तुम्ही मधुमेह रुग्ण असाल आणि फक्त साखर आणि गोड पदार्थापासून दूर राहिल्यास सर्व ठीक होईल, असे वाटत असेल, तर थांबा! तुमच्या स्वयंपाकघरातील पांढरे मीठही तुमच्या आरोग्याचा सर्वात मोठा शत्रू बनू शकते! होय, उत्कृष्ट उपचार आणि आयुर्वेदिक औषधांसाठी प्रसिद्ध असलेले आयुर्वेद तज्ञ डॉ. पंकज कुमार यांनी हे सांगितले आहे. ते म्हणतात की, मधुमेह रुग्णांनी साखरेपेक्षा मीठाच्या सेवनाबाबत अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे, कारण ते थेट रक्तदाबावर परिणाम करू शकते आणि तुमची स्थिती बिघडवू शकते.

साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी कोणते पदार्थ खावेत?

डॉ. पंकज कुमार यांच्या मते, मधुमेह रुग्णांनी त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष दिले पाहिजे आणि त्यांच्या आहारात भरड धान्य, ताज्या भाज्या आणि कमी चरबीयुक्त आहाराचा समावेश केला पाहिजे. नाश्त्यात कोशिंबीर, फळे किंवा ताज्या रसाचा समावेश करणे उत्तम आहे. दुपारच्या जेवणात, तुम्ही नाचणी बाजरी यांसारख्या भरड धान्यांना प्राधान्य द्यावे, कारण त्यांचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो आणि ते शरीरातील रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढवत नाहीत. रात्रीचे जेवण हलके असणे खूप महत्वाचे आहे. डॉ. कुमार यांच्या मते, सूर्यास्ताच्या सुमारास रात्रीचे जेवण करणे उत्तम आहे. या वेळी तुम्ही कोशिंबीर, उकडलेल्या भाज्या आणि हलकी लापशी किंवा खिचडी खाऊ शकता. जर तुम्ही मधुमेह रुग्ण असाल, तर फास्ट फूड, रिफाइंड पीठ, तळलेले पदार्थ आणि पॅक केलेले पदार्थ यांना स्पर्शही करू नका! मॅगी, पास्ता, बिस्किटे, बेकरी पदार्थ, स्नॅक्स आणि कोल्ड ड्रिंक्स हे तुमच्या आरोग्याचे सर्वात मोठे शत्रू आहेत. याशिवाय, मांस, मासे, अंडी आणि चिकन यांसारख्या प्राण्यांच्या उत्पादनांपासून दूर राहा. तुम्हाला कधीतरी त्यांचे सेवन करायचे असेल, तर ते खूप मर्यादित प्रमाणात करा.

मीठही धोकादायक! पांढऱ्या मिठाऐवजी सैंधव मीठ वापरा

डॉ. कुमार म्हणतात की, मधुमेह रुग्णांनी केवळ साखरेबाबतच नव्हे, तर मीठाच्या सेवनाबाबतही काळजी घ्यावी. पांढरे मीठ शरीरातील पाण्याची पातळी असंतुलित करू शकते आणि उच्च रक्तदाबाला प्रोत्साहन देऊ शकते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यामुळे सैंधव म ीठाचे सेवन करा, कारण ते शरीरासाठी अधिक फायदेशीर आहे आणि उच्च रक्तदाब नियंत्रित करते.

तेल आणि तळलेले पदार्थ शरीरासाठी विष आहेत!

जर तुम्ही मधुमेह रुग्ण असाल, तर तळलेले पदार्थ पूर्णपणे टाळले पाहिजेत. जास्त तेल, तूप आणि म सालेदार पदार्थ रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढवू शकतात. वाफवलेले पदार्थ, उकडलेल्या भाज्या आणि कमी तेल असलेले पदार्थ तुमच्या आरोग्यासाठी चांगले असतील. डॉ. पंकज कुमार सांगतात की, मधुमेह नियंत्रणात ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे हलका आहार घेणे. तुम्ही जितके कमी खाल, तितका तुमचा शरीर चांगला प्रतिसाद देईल. याशिवाय, दररोज व्यायाम, योगा आणि ध्यान करूनही मधुमेह नियंत्रणात ठेवता येतो.

## जर तुम्ही हृदयाचे रुग्ण असाल, तर चुकूनही पिऊ नका हे आरोग्यदायी पेय, जाणून घ्या तोटे

उन्हाळ्यात ताक आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. शरीर थंड ठेवण्यासोबतच आतड्यांचे आरोग्यही सुधारते. कॅल्शियम, फॉस्फरस, व्हिटॅमिन बी १२ आणि खनिजे यांसारखे अनेक आवश्यक पोषक घटक ताकाम ध्ये आढळतात. हे सर्व पोषक आपल्या शरीरातील अनेक समस्या कमी करू शकतात.

पण तुम्हाला माहित आहे का की काही परिस्थितींमध्ये ताक अजिबात पिऊ नये. असे केल्याने आपल्या शरीरात अनेक समस्या उद्भवू शकतात चला जाणून घेऊयात ताक खाल्ल्याने शरीराला कोणते नुकसान होते?

सर्दी, खोकला किंवा घसादुखीचा त्रास होत असल्यास ताक पिणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. आम्ही तुम्हाला सांगतो की ताकाचा कूलिंग इफेक्ट असतो, त्यामुळे त्रास कमी होण्याऐवजी वाढू शकतो. याशिवाय अशा परिस्थितीत रात्रीच्या वेळीही ताक पिणे टाळावे.

जर तुम्हाला किडनी किंवा एक्जिम ाशी संबंधित काही समस्या असतील, तर अशा परिस्थितीतही ताक पिऊ





नका. असे केल्याने आरोग्याला अनेक प्रकारची हानी होऊ शकते. किडनीशी संबंधित समस्या असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच ताक सेवन करा.

ताकामध्ये सॅच्युरेटेड फॅट मुबलक प्रमाणात आढळते. अशा परिस्थितीत हृदयाशी संबंधित समस्या असलेल्या रुग्णांसाठी ताक सेवन करणे आरोग्यदायी मानले जात नाही. आरोग्य तज्ञांच्या मते, हृदयाच्या रुग्णांनी ताक प्यायल्यास ते कोलेस्ट्रॉल वाढवू शकते, जे त्यांच्यासाठी धोकादायक आहे.

वाढत्या वयाबरोबर लोकांना हाडांशी संबंधित समस्यांचा सामना करावा लागतो. या समस्यांमध्ये सांधेदुखी, संधिवात आणि स्नायू दुखणे इ. अशा परिस्थितीत ताक पिणे टाळावे. यामुळे सांधेदुखी आणि कडकपणा वाढू शकतो. ताक पिण्यापूर्वी, कृपया आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल कांगणे यांचे प्रबोधनात्मक कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर -लोणार मतदार संघाचे लाडके आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल कांगणे सर यांचे विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक मार्गदर्शन कार्यक्रम १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता मेहकर येथील कृषी वैभव लॉन्स डोणगाव रोड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना शहर प्रमुख किशोर भास्करराव गारोळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांचा वाढदिवस १५ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. त्याचबरोबर आमदार खरात यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

१८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता मेहकर येथील डोणगाव रोडवरील कृषी वैभव लॉन्स येथ हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे विठ्ठल कांगणे सर यांच्या प्रबोधनात्मक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा मेहकर लोणार मतदार संघातील विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना शहर प्रमुख किशोर भास्करराव गारोळे यांच्यावतीने करण्यात आले आहे.




## संक्षिप्त...


### रात गई बात गई, कोकाटेंचे विरोधकांना उत्तर



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** रात गई बात गई, पुढची इनिंग जोरदार असेल, असे वक्तव्य मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले आहे. मागील काळात कोकाटे यांच्यावर जोरदार टीका होत होती. त्याबाबत बोलताना त्यांनी, ज्या गोष्टी होऊन गेल्या, त्या बाबत आता बोलून अर्थ नाही.असे वक्तव्य मंत्री माणिकराव कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना करून विरोधकांना उत्तर दिले. यावेळी ते म्हणाले की, अजित पवारांच्या उपस्थितीत जळगावमध्ये आज पक्षप्रवेशाचा मोठा सोहळा पार पडला.मी संपर्क मंत्री असल्याने या कार्यक्रमाला उपस्थित राहणे अपरिहार्य आहे.या कार्यक्रमासाठी माझी उपस्थिती आहे. दुसरा कुठलाही विषय नाही. प्रतिभा शिंदे राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करणार आहेत. आणि त्यांचा पक्षप्रवेश सोहळा हा पार पडणार आहे. अतिशय मोठा असा पक्षप्रवेश सोहळा हा होणार आहे.दिवसेंदिवस राष्ट्रवादी अजित पवार गटाला मोठ्या प्रमाणात जळगाव जिल्ह्यात बळ मिळत आहे. ती ताकद सत्यामध्ये परावर्तित आम्ही करू, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अपक्ष की युती हा निर्णय पक्ष घेईल. गिरीश महाजन यांनी स्वबळाचे संकेत दिले आहेत. मात्र,त्यांनी त्यांच्या पक्षाचा विचार करावा. मात्र, निवडणुका स्वबळावर किंवा महायुती म्हणून लढवायच्या हा निर्णय आमचे नेते एकत्र बसून निर्णय घेतील.अशी प्रतिक्रिया मंत्री माणिकराव कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### नाशिक जिल्ह्यात एकच पक्षाचे ७ आमदार असलेल्या पक्षाला पालकमंत्री पद मिळाले पाहिजे : मंत्री छगन भुजबळ



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यात एकच पक्षाचे ७ आमदार असलेल्या पक्षाला पालकमंत्री पद मिळाले पाहिजे,अशी अपेक्षा मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकचा पालकमंत्रीबाबत व्यक्त केली. यावेळी ते म्हणाले की, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीला मी नसतो. रायगडमध्ये आमची एक सीट असताना, आम्ही पालकमंत्री पदाचा आग्रह धरला आहे.नाशिक जिल्ह्यात आमचे ७ आमदार असताना, पालकमंत्री पदासाठी आमच्या लोकांना आग्रह धरायला लावेल.७ आमदार एकच पक्षाचे असतील, तर त्या पक्षाला पालकमंत्री पद मिळाले पाहिजे. नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी आग्रह कायम आहे. अजित पवार आणि सुनील तटकरेंशी मी बोलेन, एक आमदार असताना आपण पालकमंत्री पदासाठी आग्रह धरतो. तर ७ आमदारांसाठी पालकमंत्री पदासाठी शक्ती लावा,असे मी म्हणेन. पालकमंत्री पद मिळाले, तर इच्छुक नाही तर नाही. सर्व मंत्र्यांमध्ये २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टचे झेंडावंदन जास्तीत जास्त मी केल आहे.१९९१ पासून मी झेंडावंदन करतो आहे. त्यामुळे मला त्याचे काही दुःख नाही.असे मतही यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### घरकुलासाठी लवकरच सकारात्मक निर्णय : मंत्री दत्तात्रय भरणे



दैनिक आपला विदर्भ

**इंदापूर/प्रतिनिधी :** घरकुलासाठी लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, शेती महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सुरु केलेल्या उपोषणाला मी स्वतः भेट दिली. त्यांच्या मागण्या पूर्णपणे बरोबर आहेत. २०१४ पासून मी स्वतः या प्रश्नांसाठी पाठपुरावा करत आहे. अक्षरशः त्यांच्या घरातील चुलीत पाणी होते, एवढ्या कठीण परिस्थितीत हे कामगार राहतात. त्यांचा घरकुलाचा विषय मी वारंवार मांडला आहे. आणि त्यासाठी शेती महामंडळाच्या जागेचा वापर करून, उपाय शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. जवळपास ५० टक्के काम पूर्णही झालं आहे. रामराजे निंबाळकर यांनी दोन गुंठे जागा मिळावी अशी मागणी आहे. महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे लवकरच या संदर्भातील बैठक घेणार असून, त्यातून कामगारांसाठी सकारात्मक निर्णय व्हावा. अशी मी त्यांच्याकडे विनंती करणार आहे.अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## संघाची दिल्लीत दोन दिवस बैठक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिकेने अलीकडेच भारतावर ५० टक्के कर लावण्याची घोषणा केली होती. भारतानेही अमेरिकेच्या या निर्णयावर आक्षेप घेतला होता. आतापर्यंत अमेरिकेने आपला निर्णय मागे घेतलेला नाही किंवा तो मागे घेण्याबाबत काहीही सांगितलेले नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही या संपूर्ण प्रकरणावर आक्षेप घेतला होता आणि अमेरिकेवर दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचा आरोप केला होता. आता संघ यासंदर्भात १९ आणि २० ऑगस्ट रोजी देशाची राजधानी दिल्लीत महत्त्वाची बैठक घेणार आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून १९ आणि २० ऑगस्ट रोजी दिल्लीत एक मोठी बैठक आयोजित केली जात आहे. अमेरिकेने ५० टक्के कर लादल्यानंतर, दिल्लीत अधिकाऱ्यांची एक तातडीची मोठी बैठक बोलावण्यात आली आहे. संघाचे सर्व उच्चपदस्थ अधिकारी, आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या बैठकीत मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांच्याव्यतिरिक्त सर्व ६ सह-सरकार्यवाह व अनेक अखिल भारतीय अधिकारी उपस्थित राहतील.

संघाच्या या मानसिक वादळी सत्रात, नवीन अमेरिकन शुल्क धोरणाचा परिणाम आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला त्याच्या दुष्परिणामांपासून कसे वाचवायचे यासारख्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा आणि रणनीती आखली जाईल. लघु उद्योग भारती, सहकार भारती, स्वदेशी जागरण मंच, भारतीय मजदूर संघ, किसान संघ यांसारख्या संघाच्या संलग्न संघटनांचे प्रमुख लोक बैठकीला उपस्थित राहतील. भाजप आणि केंद्र सरकारमधील काही प्रमुख लोकही बैठकीला उपस्थित राहू शकतात. विशेष परिस्थिती वगळता, सामान्य परिस्थितीत सरसंघचालक, सरकार्यवाह यांसारखे उच्च अधिकारी संघाच्या आर्थिक गटाच्या बैठकीला उपस्थित राहत नाहीत.

## साऊथची सर्वात श्रीमंत अभिनेत्री, संपत्तीच्या बाबतीत अनुष्का शर्मा-कतरिना कैफही हिच्यासमोर पाणी कम चाय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या बॉलिवूड अभिनेत्रींपेक्षाही साऊथच्या अभिनेत्रींच्या चर्चा रंगलेल्या असतात. साऊथच्या अभिनेत्रींनी आपल्या सौंदर्यासोबतच अभिनयानंही सर्वांना भूरळ घातली आहे. आज आम्ही अशाच एका अभिनेत्रीबाबत सांगत आहोत, जिनं तिच्या अभिनयानं लाखो लोकांच्या हृदयात स्थान निर्माण केलं आहे. या अभिनेत्रीनं बॉलिवूड चित्रपटांमध्येही काम केलं आहे. गेल्या वर्षी तिनं अजय देवगणसोबत सुपर डुपर हिट चित्रपट दिले आहेत. ही अभिनेत्री खूप आलिशान जीवन जगते आणि ती दक्षिणेतील सर्वात श्रीमंत अभिनेत्री देखील आहे. अनुष्का शर्मा आणि कतरिना कैफ देखील संपत्तीच्या बाबतीत तिच्या मागे आहेत.

आम्ही ज्या अभिनेत्रीबद्दल सांगत आहोत, ती दुसरी तिसरी कोणी नसून सुपरस्टार अभिनेत्री ज्योतिका आहे. ज्योतिकानं दक्षिणेतील अनेक हिट चित्रपट दिले आहेत आणि खूप प्रसिद्धी मिळवली. तिनं १९९८ मध्ये डोली सजाके रखना या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. २६ वर्षांनंतर तिनं शैतान या हॉरर सिनेमातून बॉलिवूडमध्ये कमबॅक केलं. या सिनेमानं बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई केली.

कोइमोईच्या रिपोर्टनुसार, ज्योतिकाची एकूण संपत्ती सुमारे ३३१ कोटी रुपये आहे. तर, टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार, ज्योतिकाची एकूण संपत्ती ३३१ कोटी रुपये आहे आणि तिचा पती सूर्याची संपत्ती २०६ कोटी आहे. दोघांची संपत्ती मिळून ५३० कोटी रुपये आहे. त्यामुळे ज्योतिका आणि सूर्या टॉलिवूडमधील सर्वात श्रीमंत जोडप्यांपैकी एक आहे.

ज्योतिकानं मल्याळम, हिंदी आणि तमिळ सारख्या अनेक भाषांमधील चित्रपटांमध्ये काम केलं आणि न्यूज १८ च्या अहवालानुसार, ती प्रत्येक चित्रपटासाठी ५ कोटी रुपयांची फी घेते. ॲक्टिंग व्यतिरिक्त ज्योतिकाच्या उत्पन्नाचा स्रोत जाहिराती आणि रिअल इस्टेट, इतर बिझनेसमध्ये केलेली गुंतवणूक देखील आहे. ती अनेक प्रोडक्ट्स आणि ब्रँडची ब्रँड ॲम्बेसेडर देखील राहिली आहे.

तिरुमलाई स्टार तिच्या पती आणि मुलांसह चेन्नईच्या एका आलिशान परिसरात राहते. कोइमोईच्या रिपोर्टनुसार, ज्योतिकाचं घर सुमारे २०,००० चौरस फूट क्षेत्रात पसरलेलं आहे. अभिनेत्रीकडे तामिळनाडूमध्ये इतर काही मालमत्ता देखील आहेत. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या अभिनेत्रीकडे मुंबईत ७० कोटी रुपयांचं एक आलिशान अपार्टमेंट देखील आहे.

## कुठलाही बहाना न करता सरकारला आरक्षण द्यावच लागणार : मराठा समन्वयक

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** कुठलाही बहाना न करता सरकारला आरक्षण द्यावच लागणार आहे. असे मत मराठा समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातल्या आणि महाराष्ट्रातल्या गावागावात चावडी बैठका सुरू आहेत. मुंबईला जाण्यासाठी एक घर एक गाडी ही संकल्पना प्रत्येकजण राबवत आहे. वरून वातावरण दिसत नसलं तरी मराठ्यांची ही सुप्त लाट आहे. गेल्यावेळेस पेक्षा कितीतरी पटीने यावेळेस गाड्या आणि माणसं मुंबईला येणार आहेत. रेकॉर्ड होणार आहे.मराठे आरक्षण घेऊनच परतणार आहेत. महिला घरीच राहणार आहेत. मात्र, मुंबईत काही दगा फटका झाला, तर लोकप्रतिनिधींच्या घरावर शांतताप्रिय मोर्चे काढणार आहेत. अजून तरी सरकारकडून कुठला प्रतिसाद दिसत नाही. परंतु शिंदे समिती एक-दोन दिवसात मराठवाड्यात येत आहे. या वेळेला कुठलाही बहाना न करता सरकारला आरक्षण द्यावच लागणार आहे.असे मत मराठा समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## कांचनगंगा नदीला पूर आल्याने ३ तास मुंबई नागपूर महामार्गावरील वाहतुक ठप्प; शेतकऱ्यांचे पीक पाण्याखाली

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी:** डोणगाव व परिसरात कांचनगगा नदीला आलेला हा दुसरा पूर असल्याने नदीकाठावरील शेती पुन्हा एकदा खरडून गेली. तर, परिसरातील जवळपास सर्वच शेती क्षेत्र जलमय झाली आहे. शनिवार व रविवारी रात्री झालेल्या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील उभे पीक पाण्याखाली गेले असून शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे. तर, कांचनगंगा नदीला मोठा पूर आल्यामुळे डोणगावमेहकर रस्त्यावर पाणी आल्याने स्थानिक डोणगाव पोलिसांनी नदीच्या दोनही बाजुंनी बॅरिगेट लाऊन वाहतूक बंद केली होती. सकाळी आठ वाजता बंद केलेली वाहतूक पुलावरील पाणी कमी झाल्यानंतर अकरा वाजेच्या दरम्यान सुरु करण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत मागील वीस वर्षानंतर अशा पद्धतीच्या पावसाची हजेरी लागली आहे. त्यामुळे शेतातील पिके अक्षरशः शेवटच्या घटका मोजत असल्याने प्रशासनाने यावर्षी राज्यभरात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्याला भरीव मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### ओला दुष्काळ जाहीर करा : गोपाल आखाडे

परिसरात पेरणीपासून आतापर्यंत संततधार पाऊस सुरू आहे. आतापर्यंत तीन वेळा ढगफटीसदृश्य पाऊस झाला आहे. त्यामुळे परिसरात ओला दुष्काळ जाहीर करावा,शेतकऱ्यांना विनाअट सरसकट आन्थिक मोबदला द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस बुलडाणा जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी केली आहे.









### कांचनगंगा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याची गरज

डोणगाव येथील कांचनगंगा नदीला पूर आल्यामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत होते. नदीचे पात्र उथळ असल्याने नदीचे पाणी आजुबाजुच्या शेतात जाऊन पिकांचे मोठे नुकसान होते. भविष्यात ही होणारी हानी टाळण्यासाठी कांचनगंगा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याची गरज आहे. त्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकारा घ्यावा, येणाऱ्या उन्हाळ्यामध्ये या कामाला प्रारंभ करावा, अशी मागणी शेतकरी विशाल पळसकर यांनी केली आहे.

अतिवृष्टीमुळे शेलगावपार परिसरात बाभळीचे झाड मुळापासून उखडून उच्च दाबाच्या लाईनवर पडले. त्यामुळे लाईनचे दोन पोल नदीपात्रामध्ये वाहुन गेले. तीन रोहित्रातून पुरवठा होणाऱ्या विजेचा विद्युत पुरवठा खंडित झाला त्यामुळे सकाळपासूनच डोणगाव शहरातील काही भागात वीज पुरवठा नसल्याने नागरिकांची तारांमुळे उडाली असून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी अनिश्चित वेळ लागणार असल्याचे महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

# विदर्भ-मराठवाडा संपर्क तुटला

## उमरखेड तालुक्यात पावसाचा कहर नदी नाल्याला आला पूर

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी:** तीन दिवसाच्या सलग उमरखेड जोरदार पाउसा मुळे. असल्यामुळे, उमरखेड तालुक्यातील अनेक नद्या आणि नाल्यांमध्ये पाण्याची पातळी वाढली आहे. तर काही ठिकाणी गावात पाणी शिरल आहे. तर ढाणकी येथील आठरी चा नाल्यावर पूर आला असून ढाणकी बिटरगाव आणि बंदी भागाचा यामुळे वाहतूक संपर्क तुटला आहे.उमरखेड तालुक्यातील विडुळ,सावळेश्वर, करंजी, माणकेश्वर, जेवली या गावांमध्ये पाणी शीरून शेती व घराचे नुकसान झाले आहे.पुराच्या प्रवाहाची स्थिती लक्षात घेऊन आमदार किशन राव वानखेडे, सखाराम मुळे उपविभागीय अधिकारी, उमरखेड, आर. यु.



सुरडकर तहसीलदार उमरखेड यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पहाणी केली करून दिनांक १५ आगष्ट, २०२५ व दिनांक १६ आगष्ट, २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेतक-यांचे शेती पिकाचे नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे.

### पुलाची उंची वाढविण्याची मागणी

उमरखेड तालुक्यातील बंदी भागातील पंधरा गावातील लोकांना वैद्यकीय सुविधा, शिक्षण, आणि इतर आवश्यक सेवा मिळवण्यासाठी उमरखेड ढाणकी ला येण्यासाठी एकमेव आठरीच्या पुलावरून यावे लागते. पण पावसाळ्यात दरवर्षी या पुलावर पूर येत असल्याने या बंदी भागातील पूरग्रस्त भागात अडकलेल्या लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात अडचणी येतात.मदत आणि बचावकार्यात अडचणी येतात. अपुरा संपर्क आणि माहितीमुळे लोकांना वेळेवर मदत मिळत नाही, ज्यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता वाढते. पुरामुळे दळणवळण बंद झाल्यास, लोकांना वैद्यकीय सुविधा, शिक्षण, आणि इतर आवश्यक सेवा मिळवण्यात अडचणी येतात, ज्यामुळे त्यांचे जीवन अधिक कठीण होते.यामुळे या आठरीच्या नालायची उंची वाढवण्याची मागणी नागरिकांकडून वारंवार होत असताना सुद्धा अद्याप एका ही लोकप्रतिनिधीनी यावर लक्ष दिले नसून या भागातील लोक विद्यमान किशनराव वानखेडे यांच्याकडून अपेक्षा करत असून या पुलाची उंची वाढविण्याची मागणी करत आहे.

विविध वृत्त...

## प्रफुल पटेल यांचा भाजप-राष्ट्रवादी युतीबाबत मोठा गौप्यस्फोट



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** भाजपासोबत येण्याची खूप आधीपासून आमची आणि मोठ्या साहेबांची (शरद पवार) देखील इच्छा होती. मात्र, गाडी स्लीप होऊन जात होती. २०१४ च्या निवडणुकीत आम्ही काँग्रेसचा हात सोडायचा आणि भाजपवाल्यांनी शिवसेनेचा हात सोडायचा असं ठरलं होतं असा मोठा गोप्यस्पोट प्रफ ुल पटेल यांनी केला. ते गोंदियात महायुतीच्या वतीने आयोजित सत्कार समारोप कार्यक्रमांमध्ये बोलत होते. तर पुढे बोलतानी प्रफुल पटेल म्हणाले की २०१४ च्या निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी मी स्वतः बाहेरून पाठिंबा देत असल्याची घोषणा केली आणि आमच्या सहकार्याने हरिभाऊ बागडे स्पीकर म्हणून निवडून आले. मात्र, पुन्हा गडबड झाली आणि आम्ही मागे राहून गेलो तुम्ही पुढे निघून गेले असे म्हणत मंचावर बसलेल्या भाजप आमदारांना देखील टोला लगावला.

## निवडणूक आयोगावर शिंतोडे उडवण्याचं काम राहुल गांधी करत आहे - चंद्रशेखर बावनकुळे



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** निवडणूक आयोगावर शिंतोडे उडवण्याचं काम राहुल गांधी करत आहे निवडणूक आयोगाने आज आपलं उत्तर दिलं आहे, निवडणुकीदरम्यान काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी कुठही ऑब्जेक्शन घेतलं नाही. मात्र, निवडणुकीनंतर पवित्र निवडणूक आयोगावर ऑब्जेक्शन घेत आहे, जेव्हा राहुल गांधी निवडणूक हरतात तेव्हाच निवडणूक आयोगावर आक्षेप घेतात, आता महाराष्ट्रात महानगरपालिका जिल्हा परिषदेच्या निवडणुका होत आहे या निवडणुकांमध्ये राहुल गांधींनी देशभरातील संपूर्ण काँग्रेस पार्टी कामाला लावून मतदार याद्या तपासून घ्यावा असं खुला आवाहन आहे, काँग्रेस पार्टी ही हतबल झालेली आहे, काँग्रेसचा नेतृत्व हतबल झालेला आहे, आता हतबल झालेलं नेतृत्व आणि पार्टी वाचण्यासाठी राहुल गांधी निवडणूक आयोगावर आक्षेप घेत असल्याची असल्याची प्रतिक्रिया बावनकुळे यांनी दिली.

## राहुल गांधींनी कितीही यात्रा काढली तरी लोकांचा त्यांच्यावर विश्वास नाही : खासदार डॉ. अनिल बोंडे



दैनिक आपला विदर्भ


**अमरावती/प्रतिनिधी :** राहुल गांधींनी कितीही यात्रा काढली तरी लोकांचा त्यांच्यावर विश्वास नाही.अशी टिका डॉ. अनिल बोंडे यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, इलेक्शन हरले की, त्यांना ईव्हीएममध्ये दोष दिसतो. संभ्रम पसरवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.वोटर यात्रा जरी काढली तरीही यांची नौटंकी आहे. निवडणूक आयोगाने राहुल



गांधींना उत्तर दिले आहे. संविधानिक प्रक्रिया उकडून टाकण्याचा यांचा प्रयत्न आहे.तिवसा मतदार संघात यशोमती ठाकूर यांना लोक कंटाळले होते. यशोमती ठाकूर यांनी आत्मपरीक्षण करावे,पराभव स्वीकारणं शिकलं पाहिजे, - गर्वाचे घर खाली झाला आहे एवढं त्यांनी लक्षात ठेवावं.असे मत खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## भुमराळा,वझर परिसरात पुन्हा मुसळधार पाऊस; शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान शेतकरी वर्ग चिंतेत






दैनिक आपला विदर्भ

**किनगाव जटटू/प्रतिनिधी :** बिबी महसुल मंडळातील भुमराळा, वझरआघाव, देवानगर, बिबखेड, किनगाव जटटू, खंडाळा, वसंतनगर, बिबी, चोरपांगरा, मांडवा, पिंपरी खंदारे, ब्राह्मण चिकना हत्ता, खळेगाव सह परिसरामध्ये काल दिवसभर सकाळपासून रिमझिम पावसाला सुरुवात झाली होती पण रात्री पावसाने कहर केला रात्रभर पडलेल्या पावसामुळे किनगाव जटटू बिबी मंडळातील सर्वच गावात अतिवृष्टी झाली त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या तर उभे पीक आडवी झाली असून सर्वच नदी नाल्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून परिसरातील सर्वच धरणे ओव्हरफ्लो झाली आहे मुसळधार पावसाने परीसरातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कपाशी,तुर,सह अन्य पिकांच्या उत्पादनात मोठी घट होणार असल्याचे शेतकरी बोलत आहेत झालेल्या नुकसानीची तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी सह किनगाव जटटू, बिबी मंडळ अतिवृष्टीत समाविष्ट करून घ्यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे

## मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्याकडून आ. सिद्धार्थ खरात यांना शुभेच्छा

**मेहकर/प्रतिनिधी:** मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांना वाढदिवसाच्या खास शुभेच्छा देण्यासाठी जिजाऊ सृष्टीचे निर्माते, मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर व चिखली मतदार संघाच्या माजी आमदार शिवमती रेखाताई खेडेकर व संभाजी ब्रिगेडचे मेहकर तालुका पदाधिकारी यांनी मेहकर येथे येऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी जिजाऊ सृष्टीचे निर्माते, मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर व चिखली मतदार संघाच्या माजी आमदार शिवमती रेखाताई खेडेकर यांनी विविध विषयांवर चर्चा केली.



## १८ ऑगस्टला शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेचा निकाल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी () परीक्षा २०२५ चा निकाल सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

शासनाच्या दिनांक ०२ मे २०२५ च्या पत्रान्वये उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सदर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल एक महिना कालावधीत सादर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या दिनांक १६ जुलै २०२५ रोजीच्या प्रसिद्धी निवेदनाद्वारे प्रसिद्धी देण्यात आली होती.

या परीक्षेस एकूण २२८८०८ परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परोक्षस एकूण २११३०८ प्रविष्ट झाले होते. त्यापैकी बी.एड. परीक्षेचे १५,७५६ ॲपिअर व डी.एल.एड. परीक्षेचे १,३४२ ॲपिअर असे एकूण १७,०९८ विद्यार्थी/उमेदवारांनी ॲपिअर म्हणून ऑनलाईन आवेदनपत्र भरले होते. तरी दि. १४ ऑगस्ट २०२५ अखेर बी.एड. परीक्षेचे ९,९५२ व डी.एल.एड. परीक्षेचे ८२७ असे एकूण १०,७७९ ॲपिअर विद्यार्थी / उमेदवारांची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली आहे. अशा विद्यार्थ्यांचा /उमेदवारांचा निकाल प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि ज्या विद्यार्थी/ उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल एक महिना कालावधीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयास अद्यापपर्यंत सादर केलेले नाही, अशा उर्वरित बी.एड. परीक्षेचे ५,८०४ व डी.एल.एड. परीक्षेचे ५१५ अशा एकूण ६,३१९ ॲपिअर विद्यार्थ्यांचा उमेदवारांचा निकाल राखीव ठेवण्यात येईल.

तरी विद्यार्थ्यांनी/ उमेदवारांनी अद्यापपर्यंत https://www.mscepune.in/dtedola/TAIT2025 InfoAppear.aspx या लिंकमध्ये विहित मुदतीत माहिती सादर केली नाही, अशा विद्यार्थी/उमेदवारांनी दिलेल्या लिंकद्वारे विहित मुदतीत माहिती सादर न केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थी उमेदवारांची राहील. तदनंतर याबाबत आलेल्या कोणत्याही प्रकारच्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची सर्व विद्यार्थी/उमेदवारांनी नोंद घ्यावी, असेही परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## १५ ऑगस्ट २०२५ स्वातंत्र्य दिना निमित्त सरदार वल्लभभाई पटेल स्कूल लोणार येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व बक्षीस वितरण सोहळा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून लोणारच्या सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल मध्ये १३, १४,१५ऑगस्ट रोजी श्री.डोळे सर,माझी सैनिक श्री.अनिल कांबळे,आणि संस्थेचे अध्यक्ष ॲड श्री.भास्करराव सांगळेयांच्या उपस्थितीत सह उपाध्यक्ष ॲड श्री. निरंजनभाऊ सांगळे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर गुणवंतांचा सत्कार समारंभ घेण्यात आला सर्वप्रथम स. व.पटेल हायस्कूल लोणार मधून वर्ग १०वी चे बोर्डाच्या परीक्षेत गूनानुक्रमे सर्वप्रथम येणारी मुलगी हर्षदा राजीव गाभणे येणे सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला असून तिला ९५.६०%गुण प्राप्त केले होते. तिला रोख १२५००रू. बक्षीस देऊन शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच दुसरा क्रमांक शरयू राजेंद्र जाधव हिने पटकाविला आहे.तृतीय क्रमांक साक्षी गजानन थोरवे हिने पटकाविला आहे.

त्यानंतर नीट आणि इंजीनियरिंग च्या परीक्षेत प्राविण्य मिळवणारे विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ घेण्यात आला त्यामध्ये एमबीबीएस साठी पात्र ठरलेले प्रतीक गणेश बुधवत याची नायर कॉलेज मुंबई तसेच अक्षय समाधान मुंडे याची जीएमसी चंद्रपूर तसेच शुभम माणिक बुधवत जीएमसी आंबेजोगाई विवेक विश्वंभर दराडे जीएमसी वाशिम , चेतन विठ्ठल घायाळ लातूर, अथर्व




अनिल मापारी- नाशिक, जान्हवी संतोष राठोड -अहिल्यानगर आणि दिपक प्रल्हाद डोळे याने मध्ये ५०४गुण प्राप्त केले आहे.

तसेच इंजीनियरिंग चे परीक्षेत आमच्या शाळेचे अभिषेक समाधान कुकडे येणे नामांकित कॉलेजला प्रवेश प्राप्त केला आहे. त्याचबरोबर प्रतीक राजू सानप, आघावं यांनी देखील प्रवेश प्राप्त केला आहे.

राहुल कैलास गायकवाड स्पर्धा परीक्षेतून नागपूर येथे डेप्युटी एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर साठी निवड झाली तसेच पवन भास्कर गांजरे हा विद्यार्थी बुलढाणा तहसील कार्यालय एका उच्च पदावर निवड झाली आहे यांचे देखील शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार समारंभ घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट भास्करराव सांगळे काका तसेच निरंजन भाऊ सांगळे मनोहर दादा जाधव संस्थेचे उपाध्यक्ष गिरिधारी भाऊ ठाकूर तद्वतच माजी शिक्षक श्रीमान के.एन.गरकल सर.श्री... कंकाळ (नगरसेवक ) श्री.आव्हाड सर,सानप,प. ल.सर, विलासराव सानप, माझी नगरसेवक श्री शंकरराव हेंद्रे तसेच सर्व कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी कविता आघाव व आभार प्रदर्शन जागृत सरांनी केले.